# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय

फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर

## गुणवंत सत्कार कार्यक्रम (Felicitation program)

8 Aug 2024

**Report**

---

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री येथे विद्यार्थी परिषदेच्या वतीने दिनांक ०८ ऑगस्ट २०२४ रोजी श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये इयत्ता १२ वी इयत्तेत फुलंब्री पंचक्रोशीतून प्रथम व द्वितीय यश संपादन केलेल्या तसेच विशिष्ट अशी कामगिरी केलेल्या विद्यार्थी व नागरिक यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी फुलंब्रीचे पोलीस उपनिरीक्षक, मा. श्रीमती प्रतिभा आबुज यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तर पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे निमंत्रित सदस्य मा. प्राचार्य डॉ. प्रदीप जब्दे यांची उपस्थिती लाभली. या गुणवंत सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव मा. श्री. निवृत्ती गावंडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केले.

याप्रसंगी पंढरपूर येथील विठ्ठलाच्या शासकीय पूजेचा मान शिरोडी येथील श्री उत्तमराव साळुंके व सौ. कलावती साळुंके या दांपत्यास मिळाला या आपल्याला मिळालेली संधी म्हणून त्यांचासुद्धा सत्कार करण्यात आला. तसेच परिसरातील एकूण ३८ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व गुणगौरव करण्यात आला.

बोलत असताना आबुज म्हणाल्या की, जुन्या कायद्यात बदल होऊन नवीन कायदे निर्माण झालेले आहेत. हे कायदे अतिशय कडक अशा स्वरूपाची आहेत. आज रोजी मुलींच्या बाबतीतले कायदे जास्त संवेदनशील झालेली आहेत. त्यामुळे मुलींनी न्याय मागण्यासाठी पुढे आले पाहिजे. हे सर्व करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्वतःसाठी सजग असणं गरजेचं आहे. व मिडियाचा वापर करणे टाळावे. आपणास काही प्राप्त करायचे असेल तर मेहनतीशिवाय पर्याय नाही आणि त्याशिवाय स्वतःला सिद्धही करता येणार नाही. त्यासाठी मेहनत करून स्वतःला सिद्ध करावे. ही अपेक्षा व्यक्त केली.

डॉ. प्रदीप जब्दे यांनी नवीन शैक्षणिक धोरणाबद्दल माहिती दिली. बोलत असताना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी भविष्यात प्रामाणिक काम करून ते समाजासाठी व देशासाठी करा.

अध्यक्षीय समारोप करत असताना मा. श्री.निवृत्ती गावंडे म्हणाले की, आज मुली या प्रत्येक क्षेत्रात पुढे जात आहेत. व यश संपादन करत आहेत ही अभिमानाची बाब आहे. त्यांनी मुलांच्या खांद्याला खांदा लावून अभ्यास करावा व स्वतःला यशस्वी करण्याचा प्रयत्न करावा. व आयुष्यात खूप मोठे व्हावे. अशी सदिच्छा व्यक्त केली. यावेळी पालकांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रोपांचे वाटप करण्यात आले.

मान्यवरांची ओळख प्रा. विजय पांडे यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा. डॉ. दिनेश कचकुरे यांनी मानले. समारंभाच्या यशस्वीतेसाठी इतिहास विभागप्रमुख, प्रा. विजय पांडे, प्रा. डॉ. दिनेश कचकुरे यांनी परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.




गुणवंत सत्कार कार्यक्रम: उपस्थित विद्यार्थी




गुणवंत सत्कार कार्यक्रम: साळुंके दांपत्याचा सत्कार प्रसंगी

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## विद्यार्थी परिषद

## वार्षिक स्नेहसंमेलन 2024-25

### 16, 17 व 18 जानेवारी 2025

---

## अहवाल

---

महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन 16, 17 व 18 जानेवारी 2025 या कालावधीत संपन्न झाले.

17 जानेवारी 2025 रोजी 12 ते 1 या कालावधीत वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. 1 ते 2 या कालावधीत काव्यवाचन स्पर्धा, तर 2 ते 3 या वेळेत प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. दुपारी 5 वाजता विविध गुणदर्शन कार्यक्रम हा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले, डॉ. संजय पांचाळ हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी लावणी, भारुड, पोवाडा, समूहगीत, लोकगीत, वैयक्तिक गीत, नृत्य, गवळण, सुगम गायन, काव्यवाचन असे विविध प्रकार सादर केले. यानंतर फुलंब्री महोत्सवातील कलाकारांनी त्यांचे सादरीकरण केले.

18 जानेवारी 2025 रोजी 1 ते 2 या वेळेत रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. तर 2 ते 3 या वेळेत वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. दुपारी 3 ते 4 या कालावधीत वार्षिक स्नेहसंमेलनाचा समारोप समारंभ कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास डॉ. हंसराज जाधव, कथालेखक व प्राध्यापक, प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर कार्यक्रमाचे अध्यक्ष हे पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण सचिव श्री निवृत्ती गावंडे हे होते. या कार्यक्रमात कु. आरती संजय प्रधान या विद्यार्थिनीस 2024-25 यावर्षीचा “सावता भूषण पुरस्कार” देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर विद्यार्थी परिषदेच्या सर्व प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थी परिषदेच्या सचिव राधा मिसाळ यावेळी

उपस्थित होत्या. वर्षभर महाविद्यालयात झालेल्या स्पर्धा व स्नेहसंमेलनादरम्यान झालेल्या स्पर्धांचे बक्षीस वितरण याप्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

**स्पर्धांचे बक्षीस वितरण यादी**

| | | |
|---|---|---|
| विद्यार्थी संसद- सचिव | | राधा मिसाळ |
| वक्तृत्व स्पर्धा | प्रथम<br>द्वितीय | वैष्णवी दाभाडे<br>पायल तावरे |
| काव्यवाचन स्पर्धा | प्रथम<br>द्वितीय | वैष्णवी दाभाडे<br>आदित्य वाघ |
| प्रश्नमंजुषा स्पर्धा | प्रथम<br>द्वितीय | दिव्या थोरात<br>अजय बनसोड<br>वैष्णवी दाभाडे |
| रांगोळी स्पर्धा | प्रथम<br>द्वितीय | वैष्णवी दाभाडे, पायल तावरे<br>आरती शेजूळ |
| वेशभूषा स्पर्धा | प्रथम<br>द्वितीय | मुली:<br>वैष्णवी ढोके<br>आरती प्रधान<br>मुले:<br>समाधान दांगोडे<br>गौरव जाधव |
| सावता भूषण पुरस्कार | - | आरती प्रधान |
| मराठी वक्तृत्व स्पर्धा | प्रथम<br>द्वितीय | पूनम धटिंग<br>अमृता पाथरे |
| NSS | उत्कृष्ट स्वयंसेवक<br>उत्कृष्ट स्वयंसेविका | भावेश पुंडलिक जाधव<br>राधा रमेश मिसाळ |
| युवक महोत्सव | | स्वतंत्र यादी |
| हिंदी | | स्वतंत्र यादी |



प्रतिमापूजन करतांना

---




सावता भूषण पुरस्कार प्रदान करतांना

---




बोलतांना  प्रमुख पाहुणे डॉ. हंसराज जाधव

---



पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

कर्माचे डोळे ज्ञान । ते निर्दोष होआवे ।।

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय

फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

# वार्षिक स्नेहसंमेलन

## २०२४ - २०२५

## ।। सस्नेह निमंत्रण ।।

प्रति ______________________________

आमच्या महाविद्यालयातील तरुणाईचे सांस्कृतिक व्यक्तिमत्व साकारणारा वार्षिक सोहळा प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी आम्ही दि. १६ ते १८ जानेवारी २०२५ दरम्यान आयोजित करत आहोत. त्यांच्या सप्तरंगी जीवनस्वप्नांना बहरण्यासाठीच हे मोकळे आकाश मान्यवरांच्या साक्षीने खुले करीत आहोत. यात आपणही सहभागी व्हावे व आमचा आनंद द्विगुणीत करावा.

---

**दि. १६/०१/२०२५, वेळ : सकाळी १०.००**

## ।। क्रीडा स्पर्धा ।।

---

**दि. १७ जानेवारी २०२५ वेळ : १.०० ते ४.००**

## वक्तृत्व, काव्यवाचन व प्रश्नमंजूषा स्पर्धा

**वेळ : ०५:३०**

## स्पर्धा व विविध गुणदर्शन स्पर्धा

*** प्रमुख अतिथी ***

**मा. श्री. योगेश मिसाळ**, सदस्य, महाविद्यालय विकास समिती

---

## ।। समारोप समारंभ ।।

**दि. १८ जानेवारी २०२५, वेळ : दुपारी ३.००**

*** अध्यक्ष ***

**मा. श्री. निवृत्ती गावंडे**

सचिव, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था

*** प्रमुख अतिथी ***

**मा. प्रा. डॉ. हंसराज जाधव**

कथालेखक, प्रतिष्ठाण महाविद्यालय, पैठण

*** विनीत ***

**डॉ. एस.आर. टकले**

प्राचार्य

**प्रा. विजय पांडे**

प्रमुख, विद्यार्थी परिषद

**सचिव, विद्यार्थी परिषद**

**प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी**

**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री**

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय

फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर

कर्माचे डोळे ज्ञान । ते निर्दोष होआवे ।।

अध्यक्ष : मा.श्री. हरिभाऊ बागडे (नाना) सचिव : मा.श्री. निवृत्ती गावंडे

# ।। सावता भूषण पुरस्कार ।।

**२०२४-२०२५**

## कु. आरती संजय प्रधान

तीन वर्षांपूर्वी आपण या महाविद्यालयात प्रवेश घेतला.
अन् बघता-बघता तीन वर्ष पूर्ण झाली.

दरम्यानच्या कालावधीत परिसरातील आपलं वावरणं, सर्वांशी मिळून-मिसळून वागणं, निरंतर अध्ययनात मग्न राहणं आणि विविध ठिकाणी महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणे, यातून व्यक्तिमत्व घडवण्याचा आपला निर्धार सर्वांनाच जाणवला.

सदैव आपण तत्पर राहिलात राष्ट्रीय सेवा योजना आणि आजीवन शिक्षण व विस्तार विभागात सहभागाचा आणि स्वतः तर आनंद लुटलाच शिवाय मित्र-मैत्रिणींनाही सामावून घेतलं. वर्तणुकीतील आपली सहजता, सर्वांना बरोबर घेऊन काहीतरी नवीन घडवण्याचा आपला निर्धार, महाविद्यालयातील नियमतीता व आपल्यात असलेले नेतृत्व गुण, संघटन कौशल्य, सहकार्याची भावना, स्वभावातील विनशीलता सर्वांनाच भावली!

म्हणून तर आम्हा सर्वांना आनंद होत आहे, आपणास महाविद्यालयाचे भूषण असलेला ''सावता भूषण पुरस्कार'' प्रदान करताना!

आपल्या उत्तर आयुष्यात हा पुरस्कार सदैव आपणास प्रेरित व प्रोत्साहित करेल, याची आम्हाला खात्री आहे.

**डॉ. एस.आर.टकले**

**प्राचार्य**

१८ जानेवारी २०२५

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय

फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर

कर्माचे डोळे ज्ञान । ते निर्दोष होआवे ।।

## वार्षिक स्नेहसंमेलन २०२४-२५

## ।। प्रमाणपत्र ।।

श्री/कु. ____________________

आपण २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातर्फे आयोजित ____________ या स्पर्धेत ________ क्रमांक मिळविल्याबद्दल / सहभागी झाल्याबद्दल आपणास हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे. महाविद्यालय आपणास भावी काळातील सुयश चिंतिते.

।। आपले कर्तृत्व भारत मातेच्या चरणी समर्पित होओ ।।

**प्रा. विजय पांडे**
प्रमुख, विद्यार्थी परिषद

**डॉ. एस.आर. टकले**
प्राचार्य

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## 2024 - 25

## विद्यार्थी परिषद प्रतिनिधी

| | |
|---|---|
| बैनाडे अक्षय कल्याणसिंग | बीए प्रथम वर्ष |
| परदेशी प्रियंका हरीसिंग | बीए द्वितीय वर्ष |
| पिंजारी वैष्णवी रघुनाथ | बीए तृतीय वर्ष |
| बळी ओजस्वी सुभाष | बीकॉम प्रथम वर्ष |
| तुपे पूनम प्रभू | बीकॉम द्वितीय वर्ष |
| अंभोरे ऋतुजा पांडुरंग | बी कॉम तृतीय वर्ष |
| सोनिया राऊत | बीएससी प्रथम वर्ष |
| पायल तावरे | बीएससी द्वितीय वर्ष |
| वैष्णवी दाभाडे | बीएससी तृतीय वर्ष |
| कोटलवर पूजा रामकिसन | एम कॉम प्रथम वर्ष |
| पिंजारी योगेश रघुनाथ | एम कॉम व्दितीय वर्ष |
| समाधान नथू दांगोडे | राष्ट्रीय सेवा योजना व आजीवन शिक्षण विभाग |
| गौरव जाधव | सांस्कृतिक विभाग |
| राधा मिसाळ, | महिला प्रतिनिधी (अंतर्गत तक्रार) |
| आनंद जगताप | क्रीडा प्रतिनिधी |

**प्रा. विजय पांडे**
प्रमुख
विद्यार्थी परिषद